# वसई विरार शहर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक २८/११/२०१७

सभा सूचना क्र. २७ दु ११.३० वा.

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.१७/११/२०१७ रोजींचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. १७/११/२०१७ रोजींचे इतिवृत्त कायम करणेंस सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, प्रभाग समिती इतर कार्यालय यांना संगणक संच, यु.पी.एस, प्रिंटर व स्कॅनर तसेच इतर संगणकीय साहीत्य पुरविणे कामी GEM गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसच्या माध्यमातून ऑनलाईन निविदा प्रकियेद्वारे खरेदी करणेबाबत. | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. याकामी रक्कम रू. ४८,००,०००/- इतक्या खर्चास व GEM गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसच्या माध्यमातुन ऑनलाईन निविदा प्रकियेद्वारे संगणक संच, यु.पी.एस, प्रिंटर व स्कॅनर तसेच इतर संगणकीय साहित्य खरेदी करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ३. | प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं. ९५ मध्ये कौल सिटी येथे प्ले-ग्राऊंड (मैदान) विकसीत करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होवून सभेने असा निर्णय घेतला की, याबाबत करणेंत आलेल्या दरपृथक्कराच्या तपशिलासह प्रस्ताव पुर्नश्च: सादर करावा तोपर्यंत सदरचा विषय ही सभा स्थगित ठेवत आहे. यास सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ४. | प्रभाग समिती 'जी' मधील वॉर्ड नं. ७६ मध्ये गोलानी नाका येथे बॉक्स कल्व्हर्ट बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होवून सभेने असा निर्णय घेतला की, याबाबत करणेंत आलेल्या दरपृथक्कराच्या तपशिलासह प्रस्ताव पुर्नश्च: सादर करावा तोपर्यंत सदरचा विषय ही सभा स्थगित ठेवत आहे. यास सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ५. | प्रभाग समिती 'एच' वॉर्ड नं. १०४ उमेळमान डायानगरी येथे उर्वरीत नाल्याने बांधकाम करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होवून सभेने असा निर्णय घेतला की, याबाबत करणेंत आलेल्या दरपृथक्कराच्या तपशिलासह प्रस्ताव पुर्नश्च: सादर करावा तोपर्यंत सदरचा विषय ही सभा स्थगित ठेवत आहे. यास सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| ६. | प्रभाग समिती -एफ, धानिव/पेल्हार क्षेत्रातील कारगील येथे सुमेर यादव हॉटेल जवळ आर.सी.सी. बॉक्स कल्वर्ट बांधणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होवून सभेने असा निर्णय घेतला की, याबाबत करणेंत आलेल्या दरपृथक्कराच्या तपशिलासह प्रस्ताव पुर्नश्च: सादर करावा तोपर्यंत सदरचा विषय ही सभा स्थगित ठेवत आहे. यास सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | प्रभाग समिती जुना ई नविन आय कार्यालय क्षेत्रातील जुना वॉर्ड क्र.८० नविन (१०६) मध्ये उमेळा येथे समाजमंदिर बांधणे हे काम रद्द करणेबाबत. | ठराव :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. सदरचे काम हे दोन वर्षापूर्वी मंजूर झाले असून सदर जागेत स्थानिक नागरीकांनी समाज मंदिर बांधणेस विरोध दर्शविल्याने ठेकेदारास काम करणे शक्य झाले नाही. तर सदरचे काम रद्द करुन ठेकादार यांनी भरलेली इसारा रक्कम व सुरक्षा रक्कम अनामत रक्कम परत करणेंस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्रीम. विद्या पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | प्रभाग क्र.४ मध्ये विरार (पू.) बेगर्स होम नाला ते बायपास रस्ता जंक्शन पर्यंत पाईप गटार बनविणे (दोन्ही बाजू) हे काम रद्द करणेबाबत. | ठराव :- चर्चेच्या अनुषंगाने सभेने असा निर्णय घेतला की, तूर्तास सदरचा विषय स्थगित ठेवावा व दरम्यानच्या काळात सदर काम होण्याच्या दृष्टीने संबंधित जागा मालकाशी सकारात्मक चर्चा करावी तद्नंतर विषय स्थायी समिती समोर ठेवावा. अशी आजची सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | वसई विरार शहर महानगरपालिका व शब्दवेल साहित्य प्रतिष्ठान (रजि.) यांच्या संयुक्त विद्यमाने चौथे राज्यस्तरीय नरवीर चिमाजी आप्पा साहीत्य संमेलन २०१७ चे आयोजन करणेंस व त्याकरिता सहाय्य देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. वसई-विरार शहर महानगरपालिका व शब्दवेल प्रतिष्ठान (रजि) यांच्या संयुक्त विद्यमानाने दि. २६/११/२०१७ रोजी चौथ्या नरवीर चिमाजी आप्पा साहित्य संमलन आयोजन करण्यांत आले होते. सदर संमेलनाचे आयोजनाकामी विवध बाबींवर खर्च करण्यांत आलेला असून सदर खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून महानगरपालिका निधीतून ३ लक्ष आर्थिक सहाय्याची मागणी प्रतिष्ठानाच्या वतीने करण्यांत आलेली आहे. उक्त मागणीच्या अनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिकेची आजती स्थायी समिती, शब्दवेल साहित्य प्रतिष्ठान (रजि) या संस्थेस संमलनावर झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून रक्कम रु. १,५०,०००/- (अक्षरी एक लक्ष पन्नास हजार रु. मात्र) इतके आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यांस व याकामी प्रशासनातर्फे केलेल्या कार्यवाहीस ही सभा कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजूरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १० | कै. सुरेश काशिनाथ चौधरी , अधिक्षक गोखिवरे विभाग वैद्यकीय बिलाची प्रतीपुर्ती करुन मिळणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी कै. सुरेश काशिनाथ चौधरी,अधिक्षक हे सेवेत असतांना दिनांक २५/०२/२०१६ रोजी दिवगंत झाले आहेत. तरी कै. सुरेश काशिनाथ चौधरी यांना वैद्यकिय खर्चापोटी रक्कम रु. २,७२,३७५/- मधून वजावट रक्कम रु. २३, ९९४/- वजा जाता रक्कम रु. २,४८,३८१/- अक्षरी ( रु. दोन लाख अठ्ठेचाळीस हजार तीनशे एक्याऐशी मात्र) त्यांची वारस पत्नी श्रीम. भारती सुरेश चौधरी यांना अदा करणेस आजची ही सभा वित्तीय व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ११. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील जाहीरात कराविषयी सुधारणा राबविणेकामी आलेल्या जास्त दराच्या ई-निविदेस मंजूरी बाबत. | ठराव :- उपरोक्त विषयावर साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सभागृहातील सदस्यांच्या भावना लक्षात घेता व एकंदर सभागृहातील झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सदर प्रकरणी विस्तृत व परिपुर्ण माहितीसह प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे ठेवावा. तूर्तास सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवावा अशी आजची स्थायी समिती सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. कन्हैय्या भोईर सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १२. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णलयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर दंत चिकित्सक डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत. | ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर दंत चिकित्सक डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या रुग्णालयात मानद तत्वावर दंत चिकित्सक डॉक्टर उपलब्ध झाल्यास रुग्णांना फायदा होणार असल्याने याकामी डॉ. दिपाश्री शेंडे, बी.डी.एस व डॉ. भावेश अशोक कुमार शर्मा, बी.डी.एस व डॉ. प्रियंका सिंग, बी.डी.एस व डॉ. भाविका रामकृष्ण पाटील, बी.डी.एस यांना महानगरपालिकेने निश्चित केलेनुसार दरमहा रु.२,५००/- इतके मानधन व त्यांनी केलेल्या कामाची होणारी फी महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार अदा करणेकामी मा. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभा दि.२३/१०/२०१७ ठराव क्र.०६ अन्वये केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने आजची स्थायी समिती मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही स्थायी समिती प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १३. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णलयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर रेडिओलॉजीस्ट तज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर रेडिओलॉजीस्ट तज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या रुग्णालयात मानद तत्वावर रेडिओलॉजीस्ट तज्ञ डॉक्टर उपलब्ध झाल्यास रुग्णांना फायदा होणार असल्याने याकामी डॉ. पंकज पाटील, एम.बी.बी.एस., डी.एम.आर.ई.सी.पी.एस. यांना महानगरपालिका रुग्णालयात मानद तत्वावर रेडिओलॉजीस्ट तज्ञ डॉक्टर म्हणुन नियुक्त करणेस तसेच महानगरपालिकेने निश्चित केलेनुसार दरमहा रु.२,५००/- व त्यांनी केलेल्या सोनोग्राफी तपासणी करीता ५०% रक्कम व क्ष-किरण तपासणी अहवाला करीता २५% रक्कम इतकी फी अदा करणेकामी मा. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभा दि.२३/१०/२०१७ ठराव क्र.०५ अन्वये केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने आजची स्थायी समिती मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही स्थायी समिती प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १४. | मॉस्क्युटो लार्वीसाईड ऑईल (MLO) थेट भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या भारत सरकारचे उपक्रमाद्वारे खरेदी करणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाबाबत सभागृहात विस्तृत चर्चा करणेंत आली. सद्यसिस्थित हिवाळ्याचे दिवस असल्याने व डासांची वा<br>होत असल्याने १०००० लि. (MLO) हे थेट भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या भारत सरकारच्या कंपनीकडून खरेदी करणेस<br>महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका १९४९ अधिनियम अनुसूचित (ड) मधील कलम ५ (२) (२) नुसार ७७.९०+१८% GST कामी<br>येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br><br>अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडीक सूचक :- मा.श्री. कन्हैय्या भोईर<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका